## -: प्रेसनोट दिनांक- १५/०१/२०१९ :-

**(१) संभा शंकर कांबळे, वय ४८, ग्रामसेवक, पट्टणकोडोली ग्रामसेवक वर्ग - ३, यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत व (२) अरविंद आण्णाप्पा धरणगुत्तीकर, गटविकास अधिकारी, हातकणंगले पंचायत समिती वर्ग-१ (अटक नाही.) यांनी यापुर्वी १०,०००/- लाच स्विकारलेचे मान्य करून चेक मिळालेवर स्वइच्छेने आणखी लाच मागितलेबाबत......**

---

मुळ तक्रारदार यांनी पट्टणकोडोली ग्रामपंचायत मार्फत पट्टणकोडोली गावामध्ये स्ट्रीट लाईट(एल.ई.डी) लाईट बसविणेचे काम कोटेशन पध्दतीने घेतले होते. सदर काम दि. ०९/०८/२०१७ ते दि. २०/०९/२०१७ या कालावधीत पुर्ण केले असुन त्याअंतर्गत एकुण ७५ नग एल.ई.डी स्ट्रीट लाईट बसवुन सदर कामाचे बील रू. १,५५,४००/- इतके झाले होते. सदर बिलाबाबत तक्रारदार हे प्रथम ग्रामपंचायत पट्टणकोडोली येथील तत्कालीन ग्रामसेवक एस.पी.कांबळे यांची भेट घेऊन त्यांचेकडे बील सादर केले आहे. परंतु त्यांनी तक्रारदार यांचे कामाचे बीलाचा चेक काढला नाही. तक्रारदार यांनी वेळोवेळी बिलाबाबत पाठपुरावा केला होता. परंतु दरम्यान ग्रामसेवक एस.पी.कांबळे यांची बदली झाली व त्यांचे जागी पट्टणकोडोली ग्रामसेवक श्री.एस. एस.कांबळे हे ग्रामसेवक म्हणुन हजर झाले, त्यांची भेट घेवुन तक्रारदार यांनी बील मंजुरीबाबत विनंती केली असता त्यांनी कामाची पाहणी करतो व बिल काढतो असे सांगितले. परंतु त्यांनी बील न काढलेने तक्रारदार हे पंचायत समिती हातकणंगले येथील गटविकास अधिकारी श्री. धरणगुत्तीकर यांना मागील महिन्यात त्यांचे कार्यालयात जावुन भेटले असता, त्यांनी मी तुझे लाईटचे कामाचे बीलाचा चेक ग्रामसेवक कांबळे यांना सांगून काढून देतो, परंतु मला त्यासाठी रू. २५,०००/- द्यावे लागतील असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचेजवळ त्यावेळी रू. १०,०००/- असलेचे सांगितले. त्यावेळी गटविकास अधिकारी धरणगुत्तीकर यांनी ते पैसे आता दे असे सांगितल्याने तक्रारदार यांनी त्यांना रु. १०,०००/- दिले व उर्वरित पैसे चेक काढलेवर द्या असे गटविकास अधिकारी धरणगुत्तीकर यांनी तक्रारदार यांना सांगुन लाचेची मागणी केली. त्यानंतर अद्यापपर्यंत बील मंजुर झाले नसलेने तक्रारदार पुन्हा ग्रामसेवक कांबळे यांना आज दि. ०८/०१/२०१९ रोजी भेटले व बिलाचा चेक काढणेसाठी विनंती केली, तेव्हा त्यांनी सदरचा चेक काढणेसाठी प्रथम तक्रारदार यांचेकडे कामाचे रक्कमेचे २५% रक्कम मागितली. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना सदरची रक्कम फार होते असे सांगितले असता, त्यांनी रू.२५,०००/- दे, मगच मी तुझा चेक काढतो असे सांगुन लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक ०८/०१/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे ग्रामसेवक पट्टणकोडोली कांबळे व गटविकास अधिकारी धरणगुत्तीकर यांच्या विरुध्द तक्रार दिली.

तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे दिनांक ०९/०१/२०१९ रोजी पंचायत समिती, हातकणंगले या ठिकाणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये ग्रामसेवक कांबळे यांनी बीलाच्या रक्कमेच्या २५% रक्कम अथवा २५,०००/- रुपये यापैकी जे कमी असतील तेवढे रूपये लाचेची मागणी केली तसेच गटविकास अधिकारी यांना तक्रारदार हे भेटलेवर त्यांनी तक्रारदार यांचेकडुन यापुर्वी १०,०००/- लाच स्विकारलेचे मान्य करून बीलाचा अंतिम चेक मिळालेवर स्वइच्छेने आणखी लाचेची रक्कम मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्याचप्रमाणे आज दि. १५/०१/२०१९ रोजी ग्रामसेवक कांबळे यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम घेवुन कबनुर येथे बोलविलेने तक्रारदार हे तेथे गेले असता कबनुर ग्रामपंचायत चौकामध्ये ग्रामसेवक कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडे पुन्हा लाचेची मागणी करून रूपये २५,०००/- लाचेचा स्विकार केला असता ग्रामसेवक कांबळे यांना रंगेहात पकडण्यात आलेले आहे. तसेच गटविकास अधिकारी धरणगुत्तीकर यांना त्यांचे कार्यालयात तक्रारदार हे भेटणेसाठी गेले असता ते आजरोजी रजेवर असलेचे समजले. त्यांचेकडे तपास करणेची तजवीज ठेवलेली आहे. सदर घटनेबाबत संभा कांबळे, ग्रामसेवक, पट्टणकोडोली ग्रामपंचायत व अरविंद धरणगुत्तीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांचेविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. संदीप दिवाण, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.राजकुमार गायकवाड, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.गिरीश गोडे, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोलीस हवालदार मनोज खोत, पोलीस नाईक नवनाथ कदम, पोलीस कॉन्स्टेबल मयुर देसाई व संग्राम पाटील तसेच चालक पोहेकॉ. विष्णु गुरव, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.गिरीश गोडे , पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ८१०८६६०७०७, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. ५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**